# उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचे कडुन
# भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013 अंतर्गत कलम 11 ची
# अधिसूचना.

---

क्रमांक भुसंपादन मौजे बोरचक,करंजळी,श्रावणी ता.नवापुर जि.नंदुरबार/एस.आर.क्र. 02/2018.
दिनांक 21.12.2018

---

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पूनर्वसन व पूनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनिय,2013 (2013 चा 30 ) (ज्याचा उल्लेख पुढे उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे) च्या कलम 3 च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना,महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण 11/2014 /प्र.क्र.77/अ-2/दिनांक 19 जानेवारी, 2015 (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोनासाठी, एखादया जिल्हयातील 500 हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमिन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल,आणि

ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांना या सोबत जोडलेल्या अनूसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन (यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते (ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसुची दोन मध्ये दिलेले आहे.) आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (1) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमीनीचे उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्याता आहे, आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. 38 दि.13 मार्च 2015 अन्वये सिंचन प्रकल्पाना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतुदी लागु करण्यापासुन सूट देण्यांत आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही, आणि

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी प्रशासक नेमण्याची तरतूद आहे. परंतु सदर प्रकल्पात विस्थापन नाही. तसा तपशील या सोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

ज्याअर्थी आता असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम 4 अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त गट क्रमाकाच्या अथवा त्याच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीत कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5)अ नुसार जिल्हाधिकारी भुमिसंपादन, पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम 2014 (यात यापुढे त्यांचा निर्देश अक्त नियम असा करण्यात आली आहे) यांच्या नियम 10 च्या उपनियम (3) द्वारे विहित केल्या प्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करीत आहेत.

सदर अधिसूचनेबाबत ज्या हितसंबंधित व्यक्तीस आपल्या लेखी हरकती नोंदवावयाच्या आहेत त्या अधिसूचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासुन 60 दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांच्या कार्यालयात नोंदवाव्यात.

उक्त जमिनीचे नकाशे उपविभागीय अधिकार नंदुरबार भाग नंदुरबार यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहणे करीता उपलब्ध आहेत.

**अनुसुची - एक**

जमिनीचे वर्णन

**मौजे बोरचक तालुका नवापुर जिल्हा नंदुरबार**

| अ.क्र. | गट नं. | संपादीत करावयाचे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| **मौजे बोरचक ता.नवापुर जि.नंदुरबार डाव्या कालव्यावरील वितरीका क्र.6 व 7** | | |
| 1 | 35/2 | 0.04 |
| 2 | 38 | 0.12 |
| 3 | 45 पै. | 0.14 |
| 4 | 39/1 | 0.14 |
| 5 | 40 | 0.14 |
| 6 | 51 | 0.10 |
| 7 | 43 | 0.06 |
| 8 | 44 | 0.37 |
| 9 | 49/1 | 0.18 |
| 10 | 27 | 0.17 |
| 11 | 26/1 | 0.17 |

| | | |
|---|---|---|
| 51 | 47 पै. | 0.15 |
| 52 | 58 | 0.20 |
| 53 | 59/1/1 | 0.18 |
| 54 | 59/1/2 | 0.18 |
| 55 | 60/1<br>60/2<br>60/3 | 0.23 |
| 56 | 116/1 | 0.09 |
| 57 | 116/2 | 0.09 |
| 58 | 115/1/1 | 0.06 |
| 59 | 115/1/2 | 0.06 |
| 60 | 115 पै. | 0.06 |
| 61 | 117/1 | 0.09 |
| 62 | 117/3 | 0.10 |
| 63 | 117/2 | 0.10 |
| 64 | 117/4 | 0.10 |
| 65 | 57/1 | 0.09 |
| 66 | 57/2 | 0.08 |
| 67 | 57/3 | 0.08 |
| 68 | 54/2 | 0.04 |
| 69 | 54/3 | 0.04 |
| 70 | 54/2 | 0.04 |
| 71 | 53 | 0.22 |
| 72 | 76/1 | 0.04 |
| 73 | 76/2 | 0.04 |
| 74 | 76/3 | 0.04 |
| 75 | 76/4 | 0.04 |
| 76 | 76/5 | 0.04 |
| 77 | 64 | 0.13 |
| 78 | 77/1/1 | 0.21 |
| 79 | 77/2/2 | 0.12 |
| 80 | 77/2/1 | 0.29 |
| 81 | 83 | 0.03 |
| 82 | 81/1/2 | 0.07 |
| 83 | 81/1/1 | 0.07 |
| 84 | 80/2 | 0.10 |
| 85 | 80/1 | 0.10 |
| 86 | 80/3 | 0.10 |
| 87 | 84/1 | 0.02 |
| 88 | 84/2 | 0.02 |
| 89 | 84/3 | 0.02 |

| | | |
|---|---|---|
| 90 | 84/4 | 0.02 |
| 91 | 85/1 | 0.02 |
| 92 | 85/2 | 0.02 |
| 93 | 85/3 | 0.02 |
| 94 | 85/4 | 0.02 |
| 95 | 74 | 0.26 |
| 96 | 75/1 | 0.22 |
| 97 | 75/2 | 0.27 |
| | एकुण | 5.53 |
| मौजे श्रावणी ता.नवापुर जि.नंदुरबार डाव्या कालव्यावरील वितरीका क्र 6 व 7 | | |
| 98 | 232 | 0.02 |
| 99 | 208/2ब | 0.16 |
| 100 | 208/2अ | 0.16 |
| 101 | 208/1ड | 0.06 |
| 102 | 208/1क | 0.08 |
| 103 | 208/1क | 0.06 |
| 104 | 208/1अ | 0.05 |
| 105 | 202/अ | 0.11 |
| 106 | 207/अ | 0.10 |
| 107 | 209 | 0.11 |
| 108 | 225/2 | 0.22 |
| 109 | 225/1 | 0.24 |
| 110 | 223/1 | 0.08 |
| 111 | 224/अ | 0.06 |
| 112 | 222/2 | 0.21 |
| 113 | 221/1 | 0.03 |
| 114 | 221/2 | 0.05 |
| 115 | 221/3 | 0.04 |
| 116 | 221/4 | 0.06 |
| 117 | 221/5 | 0.07 |
| | एकुण | 1.97 |
| | एकुण एकदंर | 12.95 |

**अनुसूची दोन**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत वितरण.

**प्रकल्पाचे नाव** : ल.पा.यो. नेसु डावा कालवा वितरीका क्र.6 व 7 साठी जमीन संपादन प्रस्ताव.

**प्रकल्पाचे वर्णन**:मौजे बोरचक, करंजाळी,श्रावणी ता.नवापुर जि.नंदुरबार येथील जमीनींचे भुसंपादन करणे.

**समाजाला मिळणारे लाभ** : शेतक-यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊन लाभक्षेत्रातील शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणे अपेक्षीत आहे.

**अनुसूची - तीन**

विस्थापन नाही.

**अनुसूची चार**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. 38 दिनांक 13 मार्च 2015 अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासुन सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**अनुसूची पाच**

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल : लागु नाही.

**श्रीमती वान्मती सी.** भा.प्र.से.
**सहाय्यक जिल्हाधिकारी**
**नंदुरबार भाग नंदुरबार**

नंदुरबार
दिनांक 21.12.2018